गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक २८४ वा | मंगळवार ०५ मार्च २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 284 | Date : 05/03/2024 blow :Tuesday Page 4 Price 4


## पोलीस भरती प्रक्रिया उद्यापासून सुरू

मुंबई : राज्यात १७ हजार पोलिस शिपायांची भरती करण्याची घोषणा काही महिन्यांपूर्वी केली होती. परंतु भरती जाहीर होत नसल्याने पोलिस भरतीची तयारी करणाऱ्या युवकांची धाकधुक वाढली होती. अखेर सरकारने भरती जाहीर केली आहे. राज्यभरात पोलिस शिपाई पदासाठीची अर्ज प्रक्रिया मंगळवारपासून (ता. ५) सुरू होत आहे. त्यासाठी policerecruitment2024.mahait.org आणि http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर भरतीसंदर्भातील माहिती देण्यात आली असून तेथे ऑनलाईन अर्ज भरायचा आहे. आवेदन अर्ज सादर करण्यासाठी अंतिम मुदत ३१ मार्चपर्यंत देण्यात आलेली आहे.



पोलीस शिपाई , पोलीस शिपाई चालक आणि कारागृह कॉन्स्टेबल या पदांसाठी भरती प्रक्रिया होणार आहे. या पदासाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख ३१ मार्च २०२४ आहे. अर्ज करण्यासाठी उमेदवाराने मान्यताप्राप्त मंडळातून दहावी किंवा बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सर्वसाधारण श्रेणीसाठी वयोमर्यादा १८ ते २८ वर्षे आहे. खुल्या प्रवर्गासाठी ४५० रुपये शुल्क भरावे लागेल. तर राखीव प्रवर्गातील उमेदवारांना ३५० रुपये शुल्क भरावे लागेल.या भरती प्रक्रियेमध्ये प्रथम उमेदवाराची शारीरिक चाचणी घेण्यात येईल. शारीरिक योग्यता चाचणीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवारांमधून प्रवर्गामधील रिक्त पदाच्या १:१० प्रमाणात उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेत किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे. त्यापेक्षा कमी गुण मिळालेले उमेदवार अपात्र ठरतील.

# यंदाच्या निवडणुकीत ‘मोदी का परिवार’, सोशल मीडियावर भाजपाची खास मोहीम!

नवी दिल्ली : कोणत्याही क्षणी लोकसभा निवडणुकीची घोषणा होऊ शकते. त्यामुळे राजकीय घडामोडींना वेग आलाय. भाजपाने नेहमीप्रमाणे आपली संपूर्ण यंत्रणा नरेंद्र मोदी या एका नावाला आणखी मोठं करण्यात लावली आहे. मोदी यांना केंद्रस्थानी ठेवूनच यावेळी भाजपा ही लोकसभा निवडणूक लढवणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून बिहारचे राष्ट्रीय जनता दलाचे (राजद) नेते लालूप्रसाद यादव यांच्या एका विधानानंतर भाजपाने समाजमाध्यांवर ‘मोदी का परिवार’ असे म्हणत विशेष मोहीम राबवण्यास सुरुवात केलीय.

लालूप्रसाद यादव यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करताना ‘मोदींना स्वत:चा परिवार नाही’, असे विधान केले. त्यांच्या या विधानानंतर भाजपाकडून विशेष मोहीम राबवली जातेय. भाजपाच्या बड्या नेत्यांनी आपल्या समाजमाध्यमांच्या खात्यावर आपल्या नावापुढे ‘मोदी का परिवार’ असे लिहिले आहे. म्हणजे आम्ही सर्वजण मोदी यांच्या कुटुंबातील आहोत, असं म्हणत भाजपाकडून लालूप्रसाद यादव यांच्या टीकेला उत्तर दिलं जातंय.



भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय मंत्री रवीसंकर प्रसाद यांच्यासारख्या बड्या नेत्यांपासून ते महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र पडणवीस, भाजपाचे नेते चंद्रकांत पाटील यांच्यासारख्या राज्यस्तरावरच्या नेत्यांनी आपल्या एक्स खात्यावर स्वत:च्या नावानंतर कंसात मोदी का परिवार असं लिहलं आहे.

२०१९ सालच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे नेते तथा खासदार राहुल गांधी यांनी ‘चौकीदार ही चौर हैं’ म्हणत नरेंद्र मोदी । पान २ वर

## मतदानासाठी लाच घेतल्यास लोकप्रतिनिधींवर कारवाई

### सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

नवी दिल्ली : कॅश फॉर व्होट प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी महत्त्वाचा निर्णय दिला. न्यायालयाने आपला २६ वर्षे जुना निकाल रद्द करत कॅश फॉर व्होट प्रकरणात खासदार आणि आमदारांना फौजदारी खटल्यापासून मुक्ती देण्यास नकार दिला आहे. सरन्यायाधीश धनंजय यशवंत चंद्रचूड यांनी खासदारांना दिलासा देण्यावर असहमती व्यक्त केली असून संसदेच्या विशेषाधिकारांतर्गत लाचखोरीला सूट देता येणार नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने एकमताने हा निर्णय दिला आहे. मुख्य न्यायमूर्तींव्यतिरिक्त घटनापीठात न्यायमूर्ती ए. एस. बोपण्णा, न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश, न्यायमूर्ती पी. एस. नरसिम्हा, न्यायमूर्ती जे. पी. पारदीवाला, न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांचा समावेश होता.आता खासदारांनी पैसे घेऊन । पान २ वर

## महायुतीत दबावतंत्राला जोर; शिवसेनेचा २२ तर राष्ट्रवादीचा १६ जागांवर दावा

नवी दिल्ली/ मुंबई : लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने महाराष्ट्रातून एकाही उमेदवाराची घोषणा केली नसली तरी या आठवड्यामध्ये पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या दुसऱ्या बैठकीनंतर भाजपचे खासदार असलेल्या २३ जागांवर उमेदवार जाहीर केले जाण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, महायुतीतील मित्रपक्षांनीही अधिक जागा पदरात पाडण्यासाठी दबावतंत्र सुरू केले आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने गतवेळेप्रमाणे २२ जागा लढण्याची ठाम भूमिका जाहीर केली असून अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडूनही १६ जागांसाठी आग्रह केला जात आहे. भाजपने गेल्या आठवड्यामध्ये १९५ उमेदवारांची यादी जाहीर करताना उत्तर प्रदेश वगळता ‘एनडीए’तील आघाड्या असलेल्या अन्य राज्यांतील उमेदवार जाहीर करणे टाळले होते. यात महाराष्ट्राचाही समावेश होता. उर्वरित सुमारे अडीचशे जागांमध्ये महाराष्ट्र हेच सर्वात मोठे राज्य असल्याने दुसऱ्या टप्प्यातील यादीमध्ये महाराष्ट्रातील जागांवर उमेदवार जाहीर केले जाऊ शकतात. गेल्या वेळी भाजपने २३ जागा जिंकल्या होत्या, त्या जागांवर भाजपचाच दावा असून या आठवड्यात होणाऱ्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीमध्ये तेथील उमेदवारांवर शिक्कामोर्तब होऊ शकेल, असे सांगितले जाते. भाजप राज्यात ३० हून अधिक जागा लढवण्याची शक्यता व्यक्त होत असून तिढा असलेल्या जागा वगळून उर्वरित जागांवर उमेदवारांची घोषणा केली जाईल, असे सूत्रांचे म्हणणे आहे.



भाजपच्या वाटणीनंतर आपल्या वाटय़ाला अधिक जागा याव्यात यासाठी शिंदे गट आणि अजित पवार गटाने दबाव वाढवण्यास सुरुवात केली आहे. ‘शिवसेनेने २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत २२ जागा लढल्या होत्या, तेवढय़ाच जागा या निवडणुकीतही आम्हाला मिळाव्यात, यासाठी आम्ही आग्रही आहोत, । पान २ वर

## मराठा आरक्षण आंदोलनावर एकनाथ शिंदेसुद्धा फडणवीसांचीच भाषा बोलतात, मनोज जरांगेंचा आरोप

सोलापूर/प्रतिनिधी : सरकारने मराठा आरक्षण आंदोलकांवर खोटे आरोप करून आंदोलक कार्यकर्त्यांवर जाणीवपूर्वक गुन्हे दाखल करणे सुरू केले आहे. यातून मराठा समाजात नाराजीची प्रचंड लाट वाढत असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेसुद्धा आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीच भाषा बोलू लागले आहेत, असा आरोप मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी केला आहे. आता मीच सरकारचा करेक्ट कार्यक्रम करतो, असेही त्यांनी इशारावजा विधान केले.मुख्यमंत्री शिंदे यांनी मराठा आरक्षण आंदोलनाच्या संदर्भात कोणीही मर्यादा सोडल्यास त्याचा ‘करेक्ट कार्यक्रम’ करू, असे इशारावजा भाष्य केले होते. त्यावर बोलताना जरांगे यांनी मुख्यमंत्री शिंदे यांचा कडक शब्दांत समाचार घेतला.



जरांगे यांनी सोलापूर जिल्ह्यात करमाळा, मोहोळ, बार्शी आदी भागात दौरे करून सभा घेतल्या. सर्व सभांना उत्तम प्रतिसाद मिळाला. मराठा आरक्षण आंदोलन दाबून टाकण्यासाठी पोलीस आता आंदोलनाचे उभारलेले फलक काढत आहेत. यात पोलिसांना दोष देता येणार नाही तर उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्याच सांगण्यावरून मराठा आंदोलनाचे फलक काढले जात आहेत. फडणवीस यांच्या पोटात मराठा समाजाच्या आंदोलनामुळे दुखू लागले आहे, असाही आरोप जरांगे यांनी केला.आज सार्वजनिक जागेवरील फलक काढले जातील. पण आता लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या । पान २ वर

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्याचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण



वाशिम : वाशिम नगरपरिषदेमार्फत उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्र्वारुढ पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज करण्यात आले. अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाल्याने वाशिमकरांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. छत्रपती शिवरायांच्या जयजयकाराने आसमंत निनादून गेला होता.सोहळयाला संभाजीराजे छत्रपती, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, खासदार भावना गवळी, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, आमदार ड. किरण सरनाईक, माजी मंत्री महादेव जानकर, गोपीकिशन बाजोरिया, विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय, जिल्हाधिकारी बुवनेश्र्वरी एस., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, पोलीस अधीक्षक अनुज तारे, सहायक जिल्हाधिकारी अपूर्वा बासुर आदी सोहळयाला उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळकरी विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्याद्वारे मुख्यमंत्री श्री. शिंदे आणि मान्यवरांचे स्वागत केले. सोहळ्याला स्थानिक नागरिक, शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्र्वारुढ पुतळयाच्या कामासाठी नगरपरिषदेमार्फत १.२५ कोटी खर्च करण्यात आला आहे. हा पुतळा जमिनीपासून ३५ फूट उंच तर अश्र्वारुढ पुतळा १३ फूट उंच आहे.

## राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत ९५ लाख ६४ हजार ६१३ बालकांना पोलिओचा डोस

मुंबई : राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत रविवारी ३ मार्च रोजी राज्यातील ० ते ५ वर्षांपर्यंतच्या ९५ लाख ६४ हजार ६१३ बालकांना पोलिओचा डोस देण्यात आला. आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी राज्यातील जनतेला आपल्या ५ वर्षाखालील सर्व बालकांना पोलिओचा डोस देण्याबाबत आवाहन केले होते.



राज्यात एकूण ८९,२९९ बुथ व ट्रान्झिट टिम २७,५५३ फिरती पथक १५,४३० व रात्रीचे पथक ६४२ याद्वारे ० ते ५ वर्ष वयोगटातील ९५,६४,६१३ बालकांना पोलिओचा डोस देण्यात आला आहे. यानंतर ग्रामीण भागात ३ दिवस व शहरी भागात ५ दिवस (आय.पी.पी.आय.) राबविण्यात येणार असून घरोघरी जाऊन सुटलेल्या बालकांचे लसीकरण करण्यात येणार आहे.राज्यस्तरीय सनियंत्रण अधिकारी यांची नेमणूक करुन त्यांच्या मार्फत सर्व जिल्हा व मनपा या मोहिमेचे पर्यवेक्षण करण्यात आले. तसेच जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय पर्यवेक्षक यांची नेमणूक करण्यात आली व त्यांच्यामार्फत मोहिमेचे पर्यवेक्षण करण्यात आले. सर्व शासकीय विभाग, अशासकीय संस्था, जागतिक आरोग्य संस्था, युनिसेफ, जे. एस.आय., आय.एम. आय. आय. ए.पी. स्वयंसेवी संस्थांच्या सहभागाने मोहीम १०० टक्के यशस्वी होण्यासाठी मदत झाली.

देशात पोलिओ निर्मूलन कार्यक्रमाचे अंतर्गत सन १९९५ पासून पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यांत येत आहे. दिनांक ३ मार्च २०२४ रोजी राज्यात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओची अतिरिक्त मात्रा देण्यात आली आहे. दि. २७ मार्च २०१४ रोजी जागतिक आरोग्य संघटनेने भारत देश पोलिओ मुक्त असल्याचे प्रमाणित केले आहे.

पोलिओग्रस्त असणाऱ्या देशांमधून स्थलांतरामुळे देशात पोलिओ रुग्ण आढळण्याच्या धोका उद्भवू शकतो.

यासाठी पोलिओ निर्मुलनाकरिता पल्स पोलिओ लसीकरण मोहीम अत्यंत प्रभावीपणे अंमलात आणणे आवश्यक आहे.

## पदोन्नती डावलल्याने नाराज सरकारी कर्मचाऱ्यांची निदर्शन

नवी दिल्ली : केंद्र सरकारचा कणा मानल्या जाणाऱ्या आणि १०४ वर्षे जुनी यंत्रणा असलेल्या केंद्रीय सचिवालय सेवेतील (सेंट्रल सेक्रेटरीएट सर्व्हिस-सीएसएस) हजारो कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीमध्ये डावलले गेल्याच्या मुद्द्यावरून आज सर्वाधिक सुरक्षेचे क्षेत्र मानले जाणाऱ्या नॉर्थ ब्लॉकमध्ये जोरदार निदर्शने केली. पदोन्नती, प्रतिनियुक्तीवरील बंदी, सीएसएस दिवस यासारखे मुद्दे दहा वर्षांपासून प्रलंबित असल्याचीही या सीएसएस सेवेतील कर्मचाऱ्यांची तक्रार आहे.केंद्रीय सचिवाय सेवेतील १२०० अवर सचिवांना उपसचिव पदावर पदोन्नतीची प्रतीक्षा आहे. मात्र, ही पदोन्नती मिळाली नसल्याने सीएसएस कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. सीएसएस सेवेतील अधिकाऱ्यांची संघटना असलेल्या सीएसएस फोरमच्या म्हणण्यानुसार अवर सचिवांना सर्व क्षमता असूनही उपसचिवपदी बढती मिळण्यासाठी तब्बल १३ वर्षांचा कालावधी लागतो आहे. यामुळे या सेवेतील सदस्यांना पदोन्नतीपासून वंचित राहावे लागत आहे. एवढेच नव्हे तर १०० उपसचिवांनी संचालक पदावरील पदोन्नतीचे निकष पूर्ण करूनही त्यांना एकाच पदावर काम करावे लागत आहे. दीड वर्षांपासून केडर आढावा प्रलंबित आहे. विशेष म्हणजे केंद्र सरकारच्या वेगवेगळ्या मंत्रालयांनी व विभागांनी सीएसएस केडरच्या २२०० हून अधिक अतिरिक्त पदांची गरज बोलून दाखविली आहे. केंद्र सरकारने २०२२ मध्ये सीएसएस केडरचा आढावा घेण्यासाठी समिती नेमली होती. या समितीचा अहवाल अद्याप आलेला नाही. तब्बल १२०० सीएसएस अधिकाऱ्यांमध्ये भवितव्याबद्दल चिंता आहे. त्यामुळे या आढाव्याची त्वरित अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी सीएसएस फोरमने केली आहे.

# संपादकीय

## कुटुंब कसे जपायचे

अनेक प्रकारच्या केसेस सोडवताना, स्त्री, पुरुष, मुले, कुटुंबातील अन्य व्यक्ती यांच्याशी सखोल चर्चा करताना काही बाबी प्रकर्षाने जाणवतात. केसच्या अनुषंगाने पती-पत्नी, मुले यांच्याशी तर बोलावे लागतेच, पण त्याही पलीकडे जाऊन जेव्हा आपण त्यांनी सांगितलेल्या माहितीच्या आधारे, त्यांना होत असलेला घरातील इतर व्यक्तींचा त्रास लक्षात घेऊन, त्यांच्या घरातील इतर नातेवाईक अथवा लोकांशी चर्चा करतो तेव्हा लक्षात येते की, कुटुंब विस्कळीत व्हायला कारणीभूत ठरते ती घरातील लोकांची कमकुवत विचार शैली, उथळ स्वभाव, अर्धवट ज्ञान, इतरांबद्दल मत बनविण्याची घाई, अति राग, अति द्वेष, मत्सर, जळाऊ वृत्ती, तिरस्कार आणि सतत आपापसात केलेली तुलना. स्वतःच्या अनुभवातून मत बनवणे, निर्णय घेणे, परिस्थितीचा सर्वांगीण अभ्यास करणे, दुसऱ्याचे ऐकून घ्यायला कमीपणा वाटणे, वास्तवापेक्षा ऐकीव माहितीवर पटकन विश्वास ठेवून खोट्या चुकीच्या वृत्तींना अधिक फोफावण्यासाठी खतपाणी घालणे. 'जा मुली जा दिल्या घरी सुखी राहा', हा प्रत्येक मुलीला आईकडून दिला जाणारा मूलमंत्र आता काहीही झाले की, ताबडतोब पोलीस स्टेशनला जा या सल्ल्यात रूपांतरित झालेला दिसतो. अनेक कुटुंबातील वैचारिक दारिद्र्य इतके विकोपाला गेले आहे की प्रॉपर्टी, पैसा, वाटणी, हिस्सा यासाठी सर्व नातेसंबंध पायदळी तुडवले गेले आहेत. समुपदेशनाला कोणत्याही स्वरूपाचा वाद आला की त्यामध्ये पैसा-इस्टेट-प्रॉपर्टी हा अग्रणीचा मुद्दा पुढे रेटला जातो. घरातली माणसे, त्यांच्यातील प्रेम, जिव्हाळा हा फक्त एकत्र फोटो काढून सामाजिक माध्यमात टाकण्याइतपत शिल्लक आहे असे वाटते. अनेक सुशिक्षित कुटुंबे अनेक कारणांनी उद्ध्वस्त होताना आपण बघत आहोत. कोणाचा कोणाशी ताळमेळ नसल्यासारखे, फक्त स्वतःला कसा त्रास होणार नाही हे पाहून अनेकजण चालत असतात. आजमितीला समाजाची तसेच अनेक कुटुंबांची जी विदारक परिस्थिती झालेली आहे, विभक्त कुटुंब, घटस्फोट, विवाहबाह्यसंबंध, आत्महत्या, घात-पात, अपमृत्यू, ताण-तणावातून उद्भवणारे आजारपण, मानसिक आजारांचे वाढते स्वरूप, अपघात, व्यसनाधीनता, मुला-मुलींनी दिशाहीन होणे या सगळ्या गोष्टींना कारणीभूत घराघरातील मतभेद, वैचारिक दारिद्र्य, कुटुंबाला एकत्रित ठेवण्यासाठी अपेक्षित असलेल्या दमदार नेतृत्वाचा अभाव. त्यामुळे या सगळ्याचा सर्वांगीण विचार करून आपण आपली संस्कृती, आपले कुटुंब कसे जपायचे हे आता फक्त आपल्याच हातात आहे.

बाप म्हणजे असा जादूगर आहे जो दुःखाला सुखात बदलतो,पाठीशी खंबीर उभा राहून लढायला शिकवतो,संकटावर मात करून जिंकण्याचे सामर्थ्य भरतो.ईमानदारीने मेहनत करून जगण्याचे बळ निर्माण करतो.स्वाभिमानाने जगण्याचे केवळ उपदेश न देता उभ आयुष्य उदाहरण बनून जगून दाखवतो.बाबा,वडील,पप्पा,डॅडी आणि पिता अश्या अनेक नावाने प्रसिद्ध असलेला हा दुवा आपल्या जीवनाच्या प्रत्येक वाटेवर न थकता साथ देत राहतो.अगणित त्याग करत मनातील इच्छा आणि आकांशाची आहुती देत आपले मार्ग प्रकाशित करण्यासाठी अविरत जळत राहतो.जबाबदारीचे ओझे वाहून थकला तरी त्याला थांबण्याची मुभा नाही कारण जो भार त्याने उचलला आहे त्याला उंच शिखरापर्यंत पोहोचवण्यासाठी तो निघालेला असतो .कर्तव्य निभावत असताना किती यातना झाल्या यापेक्षा तो त्या कर्तव्याची पूर्तता करण्यास जास्त महत्त्व देतो.




आजही ज्यांना बाप नावाचा आधार आहे ते नक्कीच जीवनात खचत नाहीत कारण आज बाप जरी कमवत नसला तरी त्याने आपल्याला स्वतःच्या पायावर उभे राहून कमावण्याची जी योग्यता दिली आहे त्याचे मोल कधीच होणार नाही.निस्वार्थ भावनेने इतरांच्या मदतीस धावून त्याने आपले सुंदर विश्र्व निर्माण केलेले असते आणि सर्वांच्या मनात घर करणारा हा पिता स्वतःच्याच घरात कधी परका होऊन जातो हे कळतच नाही.जीवनाची पूर्ण जमापुंजी खर्च करून तो केवळ घर उभं करतं नाही तर त्याच्या स्वप्नातील ते अनोखे जग असते ज्यासाठी खडतर प्रवास करून त्याने ते मिळवलेले असते. साऱ्या जगाशी झुंज देत त्याने आपले अस्तित्व टिकवून ठेवलेले असते. मुले जशी मोठी होतात तशी त्यांची समज विकसित होत नाही.सर्रासपणे बोलण्या बोलण्यात मुले एकमेकांना वडिलांच्या नावाने हाका मारतात,शिवीगाळ करताना बापाचा उल्लेख करतात.ज्या बापाच्या जीवावर उड्या मारतात त्याच बापाला एकेरी बोललात.काही ठिकाणी वडिलांना मारहाण केल्याची घटना ऐकण्यास मिळते तर काही ठिकाणी शुल्लक वादातून पित्याचा खून झालेला ऐकण्यात येतो.असंख्य संकटाना सामोरे जात ज्याने सुंदर जीवन घडवण्याचा उद्देश पूर्ण केला त्याच्या जीवनी एवढे दुःख का?चांगली कमावती मुले माय बापाला वृद्धाश्रमात सोडून त्रासातून मुक्त झाल्याचा आनंद मानतात परंतु ते विसरून जातात की ज्यांच्या अंगा खांद्यावर लहानाचा मोठा झाला त्याला आज खरी आधाराची गरज आहे.काठीचा आधार घेत एक एक पाऊल पुढे टाकणाऱ्या बापाला खरतर काठीचा पण भार होत असेल.

खरे म्हणजे बापाच्या भूमिकेतून जग पाहायला शिकलं तरच त्याचा त्याग कळेल ,त्याची ओढ कळेल आणि कळेल अंतरीची पिढा ज्यात तो रोज होरपळत राहतो.आपण सहजच म्हणून जातो बाबा तुम्ही माझ्यासाठी केलंच काय? अरे वेड्या तू उभा आहेस या पेक्षा अजून मोठा पुरावा त्याने काय द्यावा तुला.बेहिशोबी संपत्ती त्याने तुझ्यासाठी जतन केलेली ती म्हणजे निर्मळ मन आणि प्रभावी जीवन ज्याद्वारे कोणतीही अडचण सहज दूर करणे शक्य होते.जेंव्हा जेंव्हा आपण कशाचा हट्ट केला तेंव्हा तेंव्हा त्याने जिवाचं रान करून ती वस्तू आपल्या नजरेसमोर उभी केली आणि जेंव्हा त्याच्या उतरत्या वयात त्याने हट्ट केला तेंव्हा आपण त्या हट्टाला नजरांदाज करत राहतो.

हे कुठेतरी थांबल पाहिजे,बापाला त्याच हक्काचं सर्व मिळण्यासाठी त्याने आक्रोश करावा ही वेळच येऊ नये.मुलांनी कर्तव्य निभावत त्यांना समाधान प्राप्त करण्यासाठी जे करता येईल ते करत राहिले पाहिजे.आपण करू शकतो या भावनेने नाही तर बाप ह्या सर्वास पात्र आहे म्हणून.माझ्या रूपाने त्याने जी गुंतवणूक केलेली आहे त्या गुंतवणुकीला व्याजासह परत करून देण्याची संधी त्याने दिली यातच आपले सर्वस्व.

ईश्र्वरा तू असशील मोठा जगी
माझ्यासाठी तो तुझ्या पेक्षाही महान आहे
स्वतःला उगाळून मला सुगंधित करणारा
बाप माझा चंदनाची सहान आहे

**पवन श्रीरंगसा कुसुंदल,नांदेड**
**मोब.९०७५५९५६९५**

# 'डव्हान्टेज चंद्रपूर २०२४ –इंडस्ट्रियल एक्स्पो अँड बिझनेस कॉन्क्लेव्ह'चे उद्घाटन

मुंबई : देशाच्या विकासात आता चंद्रपूर महत्त्वाची भूमिका निभावणार असून डव्हान्टेज चंद्रपूरच्या माध्यमातून लक्ष्मी मित्तल ग्रुपसह १९ कंपन्यांशी सामंजस्य करार केले गेले आहेत. चंद्रपूर प्रशासन या सर्व कंपन्यांच्या पाठीशी पूर्ण उभे राहून केवळ चंद्रपूरच नाही तर देशाच्या विकासातही हातभार लावेल, असे प्रतिपादन वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. 'देश के निर्माण में चंद्रपूर मैदान में' असे सांगून देशविकासाच्या कार्यात चंद्रपूर महत्वाची भूमिका बजावेल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जिल्हा प्रशासन, एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन, चंद्रपूर व असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय 'डव्हांटेज चंद्रपूर २०२४ - इंडस्ट्रियल एक्स्पो अँड बिझनेस कॉन्क्लेव्ह' चे सोमवारी वन अकादमी येथे उद्घाटन झाले.

त्यावेळी मंत्री श्री मुनगंटीवार बोलत होते. कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह आमदार किशोर जोरगेवार, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा, सीईओ विवेक जॉन्सन, मनपा आयुक्त विपीन पालिवाल न्यू ईरा व्यवस्थापकीय संचालक बाळासाहेब दराडे, लॉईडचे मधूर गुप्ता, कुमार वार, राकेश प्रसाद, राजेश झंझाड, जी. डी. कामडे, आलोक मेहता, के. जी. खुबाटा, मधुसूदन रुंगटा उपस्थित होते.मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, चंद्रपूर हे आतापर्यंत कोळसा, सिमेंट यासाठी ओळखले जात होते. येथे स्थापन झालेले उदयोग भविष्यात अधिक प्रगती करतील. त्याचा लाभ स्थानिक परिसराला होईल. करार झालेल्या कंपन्यांच्या विविध परवानगींसाठी 'वन विंडो सिस्टीम' तयार करण्यासोबतच एअरपोर्ट, रेल्वे, रस्ते आदी पायाभूत सुविधा, कौशल्य विकासाचे विविध अभ्यासक्रम, संशोधन कार्यक्रमांवर भर दिला जाणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.

मंत्री श्री. लोढा यांनी श्री. मुनगंटीवार यांच्या कार्याचे कौतुक केले. आ. किशोर जोरगेवार यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या.



मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी ॲडव्हांटेज विदर्भ व चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा प्रशासनाने विविध कंपन्यांशी केलेल्या सामंजस्य करारासंदर्भात माहिती दिली. जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी चंद्रपूर जिल्ह्याच्या सामाजिक, औद्योगिक व आर्थिक विकासाबद्दल विस्तृत सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डव्हान्टेज चंद्रपूर २०२४ बद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे शुभेच्छा संदेश दाखवण्यात आले. डव्हान्टेज चंद्रपूर २०२४ संदर्भात एक चित्रफीत दाखवण्यात आली.

डव्हान्टेज चंद्रपूर २०२४ साठी राज्य शासनाचा उद्योग विभाग आणि केंद्र शासनाच्या एमएसएमई मंत्रालयाचे सहकार्य लाभले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका देशकर व श्यामल देशमुख यांनी केले.

५० वर्षांचे व्हिजन तयार करा - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

चंद्रपूर जिल्ह्याच्या क्षमता आणि कमतरता या बाबींचा विचार करून या जिल्ह्याच्या विकासासाठी, जिल्ह्याला समृद्ध व संपन्न करण्यासाठी पुढील ५० वर्षांचे व्हिजन तयार करावे, अशा सूचना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्हिडिओ संदेशातून केल्या. चंद्रपूरमध्ये ॲडव्हेंचर स्पोर्ट्स, वॉटर स्पोर्टस, पर्यटन, पर्यटकांसाठी इलेक्ट्रीक गाड्या, रिसॉर्टस, बांबू लागवड, मत्स्यव्यवसाय यावर काम करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

चंद्रपूरमध्ये स्टील प्लांट उभारणार - अलोककुमार मेहता

लक्ष्मी मित्तल ग्रुपचे संचालक (मायनिंग अँड स्ट्रॅटेजिक प्रोजेक्ट) अलोक कुमार मेहता यांनी महाराष्ट्रात येऊन सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्याची संधी मिळाल्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले. चंद्रपूरमध्ये ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करून स्टील प्लांट स्थापन करण्यात येणार असून त्या माध्यमातून ६० हजार प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती केली जाईल, असे ते म्हणाले. मधुसुदन रुंघटा यांनीही मनोगत व्यक्त केले.

१९ सामंजस्य करार, ७५ हजार ७२१ कोटींची गुंतवणूक

'ॲडव्हांटेज चंद्रपूर'च्या उद्धाटन सत्रात लक्ष्मी मित्तल ग्रुपसह एकुण १९ सामंजस्य करार करण्यात आले. यामध्ये सुमारे ७५ हजार ७२१ कोटी रुपयांचे करार करण्यात आले ज्या द्वारे या भागात ५० हजारहून अधिक रोजगार निर्माण होणार आहेत. जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी जिल्हा प्रशासनाच्यावतीने या करारावर स्वाक्षरी केली. या विविध करारांवर आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया लिमिटेडचे अलोककुमार मेहता, न्यू ईराचे व्यवस्थापकीय संचालक बाळासाहेब दराडे, लॉईड मेटल्सचे मधूर गुप्ता, चंद्रपूर सोलारचे राजेश ओसवाल, अंबुजा सिमेंट के. सुब्बलक्ष्मणन, अरविंदो रिॲलिटी इन्फ्रोस्ट्रक्चर प्रा. लि. संजय मिश्रा, राजुरी स्ट्रील्सचे विपीन जैन व विवेक गुप्ता, सनफ्लॅग अँड स्टील कंपनी लिमिटेडचे एस. महादेवन अय्यर, अल्फालॉजिक टेक्सेस लिमिटेडचे अंशु गोयल, वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड हर्षल दातार, अल्ट्राटेक एसीसीचे अतुल कंसन, डेस्टीनो मिनरल्सचे मोरेश्वर झोडे, एसआयएडी युएसएचे उमेश दिघे व अनंत एव्हियेशनचे संचालक यांनी स्वाक्षरी केल्या.

मान्यवरांच्या हस्ते यावेळी भव्य प्रदर्शनाचे उद्धाटन करण्यात आले. या प्रदर्शनामध्ये कोळसा खाणी, खनिज, लोह - पोलाद, बांबू, मत्स्यव्यवसाय, पर्यटन सोबतच पुरवठा, डेअर, ग्रीन एनर्जी, रिअल इस्टेट, वाहन उद्योग, औषधनिर्माण अशा विविध क्षेत्राशी संबंधित सुमारे १५० स्टॉल्स आहेत. मान्यवरांनी यावेळी या प्रदर्शनाची पाहणी करून कौतुक केले.

पान १ वरुन

## यंदाच्या निवडणुकीत 'मोदी का...

हे भ्रष्टाचारी असल्याचा दावा केला होता. त्यानंतर भाजपाने 'मैं भी चौकीदार' म्हणत काँग्रेसला उत्तर दिलं होतं. तेव्हा भाजपाच्या जवळपास सर्वच नेत्यांनी आपल्या समाजमाध्यमांच्या खात्यांवर आपल्या नावापुढे 'मैं भी चौकीदार' असं लिहिलं होतं. याप्रमाणेच यंदाच्या निवडणुकीत 'मोदी का परिवार' म्हणत भाजपाकडून विरोधकांच्या टीकेला चोख प्रत्युत्तर दिलं जातंय. लोकसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर कदाचित भाजपाकडून मोदी का परिवार या एका ओळीला घेऊनच भारतातील समस्त जनता ही मोदींचे कुटुंब आहे, अशा प्रकारचा प्रचार केला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे काँग्रेससह इतर विरोधक भाजपाच्या या प्रचाराला कसं तोंड देणार, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## मतदानासाठी लाच घेतल्यास

सभागृहात भाषण केले किंवा मतदान केले तर त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जाईल. सर्वोच्च न्यायालयाने घटनेच्या कलम १०५ चा हवाला दिला. लाचखोरीतून कोणालाही सूट नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. लाच घेणे आणि मतदान करणे यासाठी कारवाईपासून मुक्तता मिळणार नाही, असे न्यायालयाने म्हटले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले. त्यांनी याबाबत ट्विट केले आहे. पंतप्रधान म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाचा एक उत्तम निकाल जो स्वच्छ राजकारण सुनिश्चित करेल आणि लोकांचा व्यवस्थेवर विश्वास वाढवेल.

## महायुतीत दबावतंत्राला जोर

असे शिंदे गटाचे नेते शंभूराज देसाई यांनी स्पष्ट केले. दुसरीकडे, अजित पवार गटाने गेले दोन दिवस राज्यातील १६ जागांचा आढावा घेऊन आपण त्यासाठी आग्रही असल्याचे संकेत दिले आहेत. या काही ठिकाणी भाजप-शिंदे गटाचे खासदार आहेत.

गोंदिया-भंडारा, नाशिक, दिंडोरी, ईशान्य मुंबई, हिंगोली, धाराशिव(उस्मानाबाद), रायगड, कोल्हापूर, बुलढाणा, माढा, सातारा, शिरूर, बारामती, परभणी, अहमदनगर , गडचिरोली या जागांसाठी अजित पवार गट आग्रही आहे. सत्तेत सहभागी होण्यापूर्वी अजित पवार यांना भाजपकडून १६ जागा देण्याचे आश्र्वासन दिल्याचे राष्ट्रवादीच्या गोटातून सांगितले जात आहे.

महायुतीतील तिढय़ावर तोडगा काढण्यासाठी केंद्रीय नेत्यांच्या स्तरावर अजून चर्चा देखील झालेली नाही, असे सूत्रांचे म्हणणे आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा मंगळवारी, ५ मार्च रोजी राज्याच्या दौऱ्यावर असून अकोला, जळगाव, संभाजीनगर या तीन शहरांमध्ये लोकसभा निवडणुकीसंदर्भात पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठका घेणार आहेत. शहांच्या महाराष्ट्रातील दौऱ्यानंतर तिढा सोडवण्याला प्रयत्नांना वेग येऊ शकेल, असे समजते.

'महायुतीच्या जागावाटपाचा निर्णय अद्याप झाला नाही. सर्व घटक पक्षांशी चर्चा करून आठ-दहा दिवसांत निर्णय घेतला जाईल,' असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी नागपूर येथे स्पष्ट केले. भाजयुमोच्या कार्यक्रमानिमित्त नागपूर येथे आले असताना विमानतळावर ते पत्रकारांशी बोलत होते. अमरावतीच्या खासदार नवनीत राणा या आमच्या सहयोगी सदस्य असल्यामुळे भाजयुमोच्या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या, असेही फडणवीस म्हणाले.

## मराठा आरक्षण आंदोलनावर

तोंडावर प्रत्येक मराठा व्यक्तीने आपापल्या घराच्या दरवाजावर, कोणत्याही पुढाऱ्याने मते मागण्यासाठी आमच्या घरात येऊ नये, असे भित्तीपत्र डकवावेत, असेही आवाहन त्यांनी केले. घरावर डकवलेले भित्तीपत्र काढून टाकण्याची हिंमत कोणाचीही होणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. मराठा आरक्षण ओबीसीतून मिळण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर विश्र्वास ठेवून आपण सहा महिने वाट पाहिली. मराठा आरक्षण ओबीसीतून देण्याऐवजी दहा टक्के स्वतंत्र आरक्षणाच्या अधिसूचनेचा मसुदा प्रसिद्ध केला. त्यात सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी नाही. उलट करेक्ट कार्यक्रम करण्याची धमकी देण्याची भाषा मुख्यमंत्री शिंदे हे बोलत असलेली भाषा देवेंद्र फडणवीसांची आहे, अशी टीका जरांगे यांनी केली. मात्र मराठा समाजही आता प्रचंड नाराजीच्या लाटेत सरकारचाच 'करेक्ट कार्यक्रम' केल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

# 'लेक लाडकी' योजनेसाठी १९ कोटी ७० लाखांचा निधी वितरित : महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

मुंबई : मुलींच्या सक्षमीकरणासाठी 'लेक लाडकी' ही योजना सुरु करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत पिवळ्या व केशरी रेशन कार्डधारक कुटुंबात जन्माला आलेल्या मुलींना जन्मानंतर अनुदान देण्यात येणार आहे. यासाठी १९ कोटी ७० लाखाचा निधी वितरित करण्यात आला आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी दिली.एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, नवी मुंबई मार्फत ३६ जिल्हयांना १९.७० कोटी (रुपये १९ कोटी ७० लाख) वितरित करण्यांत आले याबाबत जिल्हा स्तरावर जिल्हा निहाय व तालुका स्तरावर कॅम्प आयोजित करुन १ एप्रिल २०२३ नंतर जन्मलेल्या मुलींना लाभ देण्याची कार्यवाही विभागामार्फत करण्यांत येत आहे.

आतापर्यत जवळपास ३५ हजार प्रस्ताव जिल्हा कार्यालयात प्राप्त झालेले असून पुढील १५ दिवसांत तालुका निहाय / जिल्हा निहाय कॅम्प आयोजित करण्यांत येत असून पात्र लाभार्थींनी जवळच्या बाल विकास प्रकल्प कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन मंत्री कु. तटकरे यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत पिवळया व केशरी शिधा पत्रिकाधारक कुटुंबात जन्मलेल्या मुलीना लाभ दिला जाईल. मुलींच्या जन्मानंतर ५ हजार रुपये, इयत्ता पहिलीत ६ हजार रुपये, सहावीत ७ हजार रुपये, अकरावीत ८ हजार रुपये तर लाभार्थी मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिला ७५ हजार रुपये याप्रमाणे एकूण रुपये १,०१,०००/- एवढी रक्कम देण्यात येईल. ही योजना दिनांक १ एप्रिल २०२३ रोजी वा त्यानंतर जन्माला येणाऱ्या एक अथवा दोन मुलींना लागू राहील, तसेच एक मुलगा व एक मुलगी असल्यास मुलीला लागू राहील. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. १ लक्ष पेक्षा जास्त नसावे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# महाराष्ट्राच्या जनतेच्या जीवनात सुख, समाधान यावे असेच धोरण, त्यासाठीच काम : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई : महाराष्ट्राच्या जनतेच्या जीवनात सुखाचे, समाधानाचे क्षण यावेत. त्यासाठीच आम्ही धोरण आखतो आणि त्यावरच काम करतो. महाराष्ट्राचा विकास हेच आमचे महाराष्ट्रासाठीचे व्हिजन आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिली.

एबीपी माझा वृत्त वाहिनीच्यावतीने आयोजित 'निवडणुकीआधी चर्चा उद्याच्या महाराष्ट्राची' या विशेष कार्यक्रमात एबीपी माझाच्या संपादिका सरिता कौशिक यांनी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांची मुलाखत घेतली. या कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते.

सीएम म्हणजे मुख्यमंत्री हे सर्वांना माहित आहे. पण माझ्यासाठी 'सीएम' म्हणजे कॉमन मॅन. या सामान्य माणसाला डोक्यात ठेवूनच आम्ही काम करत आहोत, असे नमूद करून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, 'आमचे सरकार येताच बंद झालेले, बंद केले गेलेले जनतेच्या हिताचे प्रकल्प सुरु केले. मग तो मेट्रो कारशेडचा प्रकल्प असेल किंवा अन्य महत्वाकांक्षी प्रकल्प. आता आपण पाहिलं तर असं लक्षात येईल, की महाराष्ट्राच्या सर्वदूर भागात आज विकास कामांची घौडदोड सुरु आहे. महाराष्ट्र हे पायाभूत सुविधांच्या प्रकल्पाच्या बाबतीत देशातील पहिल्या क्रमाकांच राज्य आहे. यात शिवडी न्हावा- शेवा अटल सेतू, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वेशी संबंधित मिसींग लींक, मेट्रोचे ३३७ किलोमीटरचे जाळे, वर्सोवा ते पालघर पर्यंतचे तीन कोस्टल रोड, जे ठाणे, रायगड आणि पालघर यांना जोडणारे आहेत.या सर्व प्रकल्पांतून सामान्य जनतेला फायदा होणार आहे. त्यांच्यासाठी हे प्रकल्प गेमचेंजर ठरणार आहेत. समृद्धी महामार्गामुळे शेतमाल वेगाने शहरात पोहचवता येणार आहे. हे सर्व पर्यावरणपूरक व्हावेत, लोकाभिमुख व्हावेत असाच प्रयत्न केल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.



शपथविधीनंतरच्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील सिंचन प्रकल्पांची कामे मार्गी लावण्यास, जलयुक्त शिवार अभियानाला गती देण्याचा आणि शेतकरी हिताचे निर्णय घेण्यास प्राधान्य देण्याचा निर्णय घेतल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, मराठवाडा वॉटर ग्रीडचा प्रकल्प गुंडाळून ठेवण्यात आला होता, त्याला आपण गती दिली. राज्यात आता १२० सिंचन प्रकल्प मार्गी लावले आहेत, त्यामुळे सुमारे १२ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. देशाला फाईव्ह ट्रीलियनची अर्थव्यवस्था बनवण्याचे स्वप्न देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी यांनी डोळ्यासमोर ठेवले असून त्यात एक ट्रीलियन डॉलरची भर महाराष्ट्र टाकेल, त्यासाठी राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या जात असल्याचे मत यावेळी व्यक्त केले. महिला, शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी सर्वांना न्याय देणारे लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत, असेही त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, महिला सक्षमीकरणासाठी आपण अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले, लेक लाडकी लखपती, महिलांना एसटी बस प्रवासासाठी पन्नास टक्के सवलत दिल्याने त्यांच्या अनेक गोष्टी सुलभ झाल्या. यातूनच आमच्या विकासाचा लाभ त्यांच्यापर्यत पोहचल्याचे आपण पाहतोय. राज्यात शासन आपल्या दारी, कौशल्य विकास आणि नमो महारोजगार मेळाव्यातून आपण थेट नागरिकांपर्यंत पोहचत आहोत. पायाभूत सुविधांचा विकास, शिक्षण आणि आरोग्य, कौशल्य विकास या क्षेत्रातील आमुलाग्र बदल यासाठी प्रयत्न सुरू आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांचे अपग्रेडेशन करणे सुरू आहे. आता पाच लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत मिळतील, अशी व्यवस्था निर्माण केली आहे. गुंतवणुकीच्या क्षेत्रातही महाराष्ट्राची जगभर उद्योगस्नेही आणि मनुष्यबळ, कायदा-सुव्यवस्था या दृष्टीने चांगली राज्य अशी ओळख आहे. गतवेळी आपल्याला दावोस येथील परिषदेतून १ लाख ३७ हजार कोटींची गुंतवणूक मिळाली होती. यंदा ३ लाख ७३ हजार कोटींचे गुंतवणूक करार करण्यात यश आले आहे. यातूनही लाखो रोजगार संधी उपलब्ध होणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

'आपला महाराष्ट्र, आपलं व्हिजन' अशी भूमिका घेऊन आम्ही काम करत आहोत.

यातून महाराष्ट्रातील जनतेच्या जीवनात सुखाचे, समाधानाचे क्षण यावेत, असेच धोरण आखतो आहोत, त्यासाठीच आम्ही काम करत आहोत. विकास हेच आमचे व्हिजन आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी मराठा समाजाला दिलेले आरक्षण कायद्याच्या कसोटीवर टिकेल असेही ठामपणे सांगितले. या आरक्षणामुळे अन्य कुठल्याही समाजावर, ओबीसींवर अन्याय्य होणार नसल्याची भूमिकाही त्यांनीमांडली.

# ब्राह्मण समाजास शस्त्र परवाना द्या; अत्याचार प्रतिबंधक कायद्यात समावेश करा, समाजातर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

सोलापूर/ शहर प्रतिनिधी : कुणाच्याही अध्यात- मध्यात नसणाऱ्या ब्राह्मण समाजाला अलीकडील काळात विनाकारण धमकावणी दिली जात आहे. तसेच या समाजाबाबत असंसदीय भाषा वापरली जात आहे. त्यामुळे समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे ब्राह्मण समाजातील व्यक्तीस शस्त्र बाळगण्याचा परवाना देण्यात यावा. तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८८ मधील तरतुदीप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची परवानगी मिळावी अशी मागणी ब्राह्मण समाजातर्फे सोमवारी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकारून सदरचे निवेदन वरिष्ठ पातळीवर पाठवून देण्याचे आश्र्वासन दिले.

राज्यात सध्या समाजात दुहीचे विष पेरून असंतोष पसरवण्यासाठी काही व्यक्ती आणि संघटनांकडून जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. परंतु ब्राह्मण समाज हा मुख्यतः बुद्धिजीवी आणि शांतता प्रिय समाज आहे. तमाम जनतेच्या हितासाठी ब्राह्मण समाजातील अनेक व्यक्तींनी तन-मन-धनाने आणि कोणतीही अपेक्षा न ठेवता उत्तम सेवा केली आहे आणि करतही आहे. तसेच या समाजातील कोणाही व्यक्तीने कोणत्याही समाजास कसल्याही प्रकारे नुकसान पोहोचविलेले नाही. ब्राह्मण समाज कोणत्याही शासकीय सेवा सुविधा उपलब्ध नसतानाही स्वतःच्या बुद्धीच्या जीवावर प्रगती करत आलेला आहे, अशी वस्तुस्थिती असतानाही इतर समाजातील काही व्यक्ती व संघटना अल्पसंख्य असणाऱ्या ब्राह्मण समाजाबद्दल विनाकारण बदनामीकारक वक्तव्य करून तमाम ब्राह्मण समाजास धमकावणी देत आहे. परवाच घडलेल्या जाहीर भाषणाच्या एका कार्यक्रमात बारामती तालुक्यातील सरपंच कीचक नवले यांनी तीन मिनिटात अख्खे महाराष्ट्रातले ब्राह्मण आम्ही संपवू अशी धमकीची भाषा वापरलेली आहे व हा धमकीचा व्हिडिओ सोशल मीडियावर योगेश सावंत यांनी प्रसारित केला आहे. अशा प्रकारच्या विविध समाजकंटक व्यक्ती आणि संघटनांकडून ब्राह्मण समाजास विनाकारण लक्ष केले जात असून त्यामुळे ब्राह्मण समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ब्राह्मण समाजाने सन्मार्गाने कमविलेली स्थावर आणि जंगम मालमत्ता देखील यामुळे नष्ट होईल की काय अशी भीती समाजात निर्माण झाली आहे. अशा वारंवार घडणाऱ्या धमकावणीच्या भाषेमुळे कोणत्याही सरकारने त्या समाजकंटक




व्यक्तीस अथवा संघटनांविरुद्ध कसलीही कायदेशीर कारवाई करून अशा स्वरूपाच्या समाजघातक प्रवृत्तींना जरब बसविण्याचा प्रयत्न केलेला नाही ही देखील वस्तुस्थिती आहे. त्यामुळे हे निवेदन आम्ही आपणास देत आहोत. या निवेदनाद्वारे ब्राह्मण समाजातील व्यक्तींना स्वसंरक्षणार्थ व त्याच्या मालमत्तेच्या संरक्षणार्थ शस्त्र बाळगण्याचा परवानासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तींना विशेष बाब म्हणून तातडीने परवाने देण्यात यावेत, ब्राह्मण समाजाविरुद्ध विनाकारण जातीवाचक उद्गार काढून शिवीगाळ व धमकीची भाषा वापरणाऱ्या व्यक्ती अथवा संघटनांविरुद्ध अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८८ मधील तरतुदीनुसार गुन्हा दाखल करण्याची व्यवस्था करण्यात यावी व त्या दृष्टीने शासकीय स्तरावरून योग्य ते आदेश तातडीने देण्यात यावेत, ब्राह्मण समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात यावी, विविध हिंदू धार्मिक स्थळांमध्ये पूजाविधी आणि मंत्रविधी करणाऱ्या तमाम पुरोहित वर्गास शासनामार्फत मासिक मानधन देण्यात यावे, ब्राह्मण समाजातील गरीब विद्यार्थ्यांकरता शैक्षणिक आणि आर्थिक मदत करण्यात यावी. या मागण्या आम्ही करीत आहोत. हे निवेदन सादर करताना पंचांगकर्ते मोहनशास्त्री दाते, जयंत फडके गुरुजी, रामचंद्र तळवळकर, दत्तात्रय आराध्ये, अमृता गोसावी, अमर कुलकर्णी, सुहास देशपांडे, मीनाताई चाटी, संपदा जोशी, भारती देशक गोविंद गवई, प्रमोद गोसावी, घन: श्याम दायमा, किरण करमरकर, दत्तराज कुलकर्णी, वामन कुलकर्णी, मुकुंद मुळेगावकर, विक्रम डोनसळे, डी.डी. कुलकर्णी, यांच्यासह ब्राह्मण समाजातील अनेक व्यक्ती उपस्थित होत्या.

# फकीरा दल सोलापूर जिल्हा प्रमुख ज्योतिबा पारखे यांना राज्यस्तरीय सामाजिक पुरस्काराने सन्मानीत

सोलापूर/प्रतिनिधीः दि. ४ फडकुले सभागृह सोलापूर येथे ६, मुक्ता साळवे साहित्य व सांस्कृतिक संमेलन संपन्न झाले सदर प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते तथा फकीरा दल सोलापूर जिल्हा प्रमुख ज्योतिबा पारखे यांना राज्यस्तरीय सामाजिक पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. यावेळी संमेलन अध्यक्ष मा. जेनेयू दिल्ली प्रा.मिलिंद आव्हाड उद्घाटक प्रा.वंदना सोनाळकर मुक्ता साळवे साहित्य परिषदेचे संस्थापक सचिन बगाडे,फकीरा दल प्रमुख प्रमुख सतीश जी कसबे साहेब,यशवंत फडतरे,श्रीमंत जाधव, ज्येष्ठ पत्रकार श्रीकांत कसबे साहेब, ज्येष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड सर, कवी लक्ष्मी यादव आदींसह साहित्यप्रेमी




समाज बांधव नेते कार्यकर्ते पदाधिकारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सोलापुर जिल्हा परिषद प्राथमिकचे नुतन शिक्षणाधिकारी कादर शेख यांचा सन्मान

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापुर जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी/कर्मचारी संघटनेच्या वतीने सोलापुर जिल्हा परिषद प्राथमिकचे नुतन शिक्षणाधिकारी कादर शेख यांचा सन्मान जि प सोलापुर येथे करण्यात आला.याप्रसंगी शेख यांना निवेदन देण्यात आले व चर्चा करण्यात आली.यानंतर संघटना मिटींग घेण्यात आली व प्रत्येक तालुक्यात संघटनेच्या तालुकास्तरीय मिटींग घेऊन प्रत्येक तालुक्यात संघटना सक्रिय करणेबाबत सर्वानुमते ठरले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष बाबासाहेब शेख,जिल्हानेते तथा शिक्षक समितीचे पुणे विभाग उपाध्यक्ष मो बा शेख, जिल्हा नेते बा बा शेख, अक्कलकोटचे अध्यक्ष तथा केंद्रप्रमुख इस्माईल मुर्डी सर, सरचिटणीस हजरत शेख, शिक्षक सोसायटीचे चेअरमन तथा शिक्षक संघ तालूका अध्यक्ष महेबूब सवार सर, कार्याध्यक्ष आजम पटेल सर, बार्शीचे तालुका अध्यक्ष अल्ताफ अतार सर, संघटनेचे नेते तथा बार्शी शिक्षक सोसायटीचे नुतन चेअरमन जहांगीर शेख व त्यांचे सर्व सहकारी , इम्रान सर ,बा दा मुल्ला सर ,करमाळ्याचे सखाराम राऊत सर,संतोष आंबेकर सर इत्यादी मान्यवर उपस्थित होते

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या विविध योजनेचा लाभ घ्यावा

सोलापूर/प्रतिनिधीः साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळमार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोट जातीतील कुटुंबांसाठी विविध योजना राबविण्यात येतात.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज दि.११ मार्चपर्यंत सादर करावा, असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आर.एच.चव्हाण यांनी केले आहे.

मातंग समाज व तत्सम १२ पोट जातीतील कुटुंबांचे सामाजिक, आर्थिक उन्नती व्हावी, त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराची साधणे उपलब्ध व्हावीत त्यांना सर्वसामान्यांचा विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी महामंडळाने नाविण्यपूर्ण योजना सुरू केल्या आहेत. या योजनांचा लाभ शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहचविण्यासाठी नाविण्यपूर्ण एनएसएफडीसी योजनेंतर्गत लाभ दिला जातो. यामध्ये सुविधा कर्ज योजना(कर्ज मर्यादा ५ लाख रुपये), लघु ऋण वित्त योजना (कर्ज मर्यादा १.४० लाख रुपये), महिला समृध्दी योजना(कर्ज मर्यादा १ लक्ष ४० हजार), शैक्षणिक कर्ज योजना (शिक्षणासाठी देशात ३० लाख, परदेशात ४० लाख), या कर्ज योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी वेबसाईटवर https://beta.slasdc/org ऑनलाईन अर्ज सादर करावा.

इच्छुक मांग, मातंग, मिनी-मादीग, मादीग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गोराडी, मादगी व मादिगा या जातीतील गरजू व होतकरु नागरिकांनी विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी वेबसाईटवर https://beta.slasdc/org ऑनलाईन अर्ज सादर करावा असे आवाहनही साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक श्री.चव्हाण यांनी केले आहे.

# मंगळवेढा तालुक्यातील टंचाई संदर्भात आज आमदार आवताडे यांची आढावा बैठक

मंगळवेढा/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघांमध्ये गतवर्षी अपेक्षेपेक्षा कमी पाऊस पडल्याने निर्माण झालेल्या दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्र्वभूमीवर मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे यांनी आज मंगळवार सकाळी १०.०० वाजता



जोगेश्र्वरी मंगल कार्यालय मंगळवेढा येथे टंचाईची परिस्थिती जाणून घेण्यासाठी आढावा बैठक बोलावली असून मंगळवेढा तालुक्यातील सर्व विभागाचे प्रशासकीय अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी सर्कल, कृषी सहाय्यक, पाणीपुरवठा विभाग, पशुसंवर्धन विभाग तसेच वीज वितरण यांच्यासह सर्व गावचे सरपंच, उपसरपंच आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य यांना उपस्थित राहण्याचे आवाहन आमदार अवताडे यांच्या संपर्क कार्यालयाकडून करण्यात आले आहेगतवर्षी अतिशय कमी प्रमाणात पाऊस झाल्यामुळे जमिनीमध्ये पाण्याची पातळी खोल गेलेली आहे. कमी पावसामुळे सर्व विहिरी कोरड्या पडल्या आहेत तसेच बोअर बंद असल्याने नागरिकांचे व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचे अतोनात हाल होत आहे.

तसेच जनावरांना चारा टंचाई जाणवत आहे. या सर्व बाबींचा विचार करून आमदार आवताडे यांनी सदर आढावा बैठकीचे नियोजन करून वरील दुष्काळजन्य समस्यांवरती उपाय योजना विचार विनिमय व आढावा घेण्यासाठी या बैठकीचे आयोजन केले आहे.तरी मतदार संघातील सर्व नागरिकांनी शेतकऱ्यांनी तसेच संबंधित विभागातील पदाधिकारी व अधिकारी यांनी या बैठकीसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# द.पिलर ऑफ हिंदुस्तानी सोसायटी पुरस्कार प्रित्यर्थ मारुती बावडेंचा वटवृक्ष मंदिरात सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील सोलापूर आकाशवाणीचे वृत्त निवेदक मारुती बावडे यांना आशिया खंडातील विविध देशातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामीण पत्रकारितेतील द.पिलर ऑफ हिंदुस्तानी सोसायटी हा अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार नुकतच प्रदान करण्यात आला. मुंबईतील आयटीसी मराठा या सप्त तारांकित हॉटेलमध्ये त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांना लाभलेल्या या पुरस्कारा प्रित्यर्थ आज येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी मारुती बावडे यांचा स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद, देऊन यथोचित सत्कार सत्कार केला. याप्रसंगी बोलताना महेश इंगळे यांनी मारुती बावडे हे गेल्या २३ वर्षापासून पत्रकारितेत कार्यरत असून त्यांनी विविध लेख मालिका आणि बातम्यांच्या माध्यमातून जलंत समस्यांना वाचा फोडून उत्कृष्ट पत्रकारिता केली आहे. त्यामुळे त्यांना हा सन्मान देण्यात आला असल्याचे मनोगत व्यक्त केले. या सत्कार प्रित्यर्थ बोलताना पत्रकार मारुती बावडे यांनी ग्रामीण पत्रकारितेला या पुरस्कारातून मोठे बळ मिळाले आहे.या पुढच्या काळातही सकारात्मक पत्रकारितेतून सामाजिक बदल घडविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. यावेळी मंदिर समितीचे



सचिव आत्माराम घाटगे, विश्र्वस्त महेश गोगी, गिरीश पवार, विपुल जाधव, स्वामीराव गायकवाड, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ, संजय पवार, प्रसाद सोनार आदिसह देवस्थानचे सेवेकरी उपस्थित होते.